# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२११०/१८८/१३२

Email: secretary@msbte.com Web : www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४३/उ.प.२०२०/परीक्षा अर्ज/२०२०/०५८ दिनांक – '9 SEP 2020

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नित संस्था

**विषय: अंतिम सत्र/ वर्षातील तसेच अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्न सत्र/ वर्षाचे बॅकलॉग विषयाकरिता उन्हाळी परिक्षा-२०२० चे परिक्षा अर्ज भरण्याकरीता एक विशेष संधी देणेबाबत**

संदर्भ: मंडळाचे महत्त्वाचे परीपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/उ. प.२०२०/परीक्षा अर्ज/०४१, दि. १०/०६/२०२०

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार विहीत मुदतीत उन्हाळी – २०२० चे परीक्षा अर्ज भरले नाहीत अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याची एक संधी देण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या प्राप्त विनंतीनुसार अंतिम सत्र / वर्षातील तसेच अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्न सत्र / वर्षाचे बॅकलॉग विषयांकरीता परीक्षा अर्ज भरण्यासाठीची विशेष संधी देण्यात येत आहे. त्यांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | प्रकिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी Login मधून परीक्षा अर्ज भरणे | दि. १०/०९/२०२० ते दि. ११/०९/२०२० |
| २ | विद्यार्थ्यांनी भरलेले / संस्थेमधून भरलेले परीक्षा अर्ज संस्थेने Institute Login मधून कन्फर्म करणे | दि. १०/०९/२०२० ते दि. १३/०९/२०२० |
| ३ | विभागीय कार्यालयांनी संस्थांनी कन्फर्म केलेले परीक्षा अर्ज निश्चित करणे | दि. ११/०९/२०२० ते दि. १४/०९/२०२० |
| ४ | विभागीय कार्यालयांमार्फत परीक्षा अर्ज निश्चित करण्याची अंतिम तारीख | दि. १४/०९/२०२० |

अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थांनी उन्हाळी – २०२० परीक्षेचे अर्ज विहीत कालावधीत भरून परीक्षेचे शुल्क आपल्या संस्थेशी संपर्क साधून ऑनलाईन पद्धतीने अथवा प्रचलित पद्धतीने संस्थेस अदा करावे व संस्थेमार्फत परीक्षा अर्ज निश्चित केला असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच संस्थांनी सुद्धा विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज व प्राप्त परीक्षा शुल्क तपासून विहीत कालावधीत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निश्चित करावेत. तदनंतर विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क ऑनलाईन द्वारे अदा करावे व संस्थास्तरावर निश्चित करण्यात आलेले सर्व परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयाने निश्चित केल्याची खात्री करून घ्यावी. तसेच संबंधित विद्यार्थांचे परीक्षा अर्ज भरून घेतल्याबाबतचे हमीपत्र संस्थेच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने ईमेलद्वारे विभागीय कार्यालयास देण्यात यावेत.

तरी सर्व प्राचार्यांनी आपल्या संस्थेतील उन्हाळी – २०२० परीक्षेकरीता अंतिम सत्र / वर्षातील तसेच अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्न सत्र / वर्षाचे बॅकलॉग विषयांचे परीक्षा अर्ज विहीत मुदतीत न भरलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याबाबतचे वेळापत्रक अवगत करून त्यांचे उन्हाळी – २०२० परीक्षेकरीताचे परीक्षा अर्ज विहीत कालावधीत भरले जातील, याची दक्षता घ्यावी.

विरजाधव

(वि. र. जाधव)

प्र. सचिव

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहीतीसाठी:

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:

उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद